
लक्षवेधी

# रोपवाटिकेच्या माध्यमातून अर्थलाभाची संधी




**प्रा. एस.बी.सातपुते**
कर्मयोगी दु.सी. पाटील कृषी महाविद्यालय, नाशिक





फळझाडांची अभिवृद्धी करून त्यांचे काही काळ काळजीपूर्वक संगोपन करण्यात येणाऱ्या ठिकाणास रोपवाटिका म्हणतात. या ठिकाणी रोपे विकणाऱ्याची विश्वासार्हता फार महत्त्वाची असते. म्हणून उत्तम प्रतीची व उत्तम जातीची रोपे तयार करून विकल्यास स्वत:सह इतरांच्या शेतीच्या प्रगतीला सुद्धा आपला हातभार लागेल.

कमी पावसाचे प्रक्षेत्र, क्षारयुक्त जमीन, कोरडवाहू शेती तसेच कमी प्रमाणात उपलब्ध असलेली जागा अशा प्रतिकूल परिस्थितीत कमी खर्चात व कमी श्रमात करता येणारा रोपवाटिकेचा व्यवसाय नक्कीच फायदेशीर ठरेल. अलीकडे राज्यातील सिंचनाखाली असलेले क्षेत्र सध्याच्या १८% पासून ४०% पर्यंत एकत्रित प्रयत्नांनी वाढविले जात आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा कल नगदी पिके, भाजीपाला, फूल व फळशेतीकडे वळत आहे. कमी सिंचनाखाली असलेले क्षेत्र व मोजके आर्थिक भांडवल यामध्ये शेतकऱ्यांना नियोजनबद्ध पद्धतीने शेती करणे गरजेचे आहे.

अशा परिस्थितीत शेतकरी रोपवाटिकेचा व्यवसाय खूप चांगल्या प्रकारे करू शकतात. त्यातून उच्च प्रतीची व उत्तम जातीची जोमदार आणि निरोगी रोपे तयार करून विकली तर शेतकऱ्यांचा फायदा होऊ शकतो. फळझाडांची अभिवृद्धी करून त्यांचे काही काळ काळजीपूर्वक संगोपन करण्यात येणाऱ्या ठिकाणास रोपवाटिका म्हणतात. या ठिकाणी रोपे विकणाऱ्याची विश्वासार्हता फार महत्त्वाची असते. म्हणून उत्तम प्रतीची व उत्तम जातीची रोपे तयार करून विकल्यास स्वतःसह इतरांच्या शेतीच्या प्रगतीला सुद्धा आपला हातभार लागेल. आपल्याकडे अधिक प्रमाणात शेतजमीन नसली तरी, तरी रोपटी वाढविण्यासाठी असलेल्या पुरेशा जागेसह आपण हा व्यवसाय सुरु करू शकतो.

**रोपवाटिकेतून होणारे फायदे**

* रोपवाटिकेद्वारे आपल्याला आयती कलमे, रोपे, उपलब्ध होत असल्यामुळे स्वतः कलमे, रोपे न करता फळबागा लावता येतात.

* कलमे, रोपे तयार करण्यासाठी वेळ, पैसे व श्रम वाया जात नाहीत.

* कलम- रोपांच्या गुणवत्तेची खात्री असल्याने शंका राहत नाही.

* दुर्मिळ कलमे सहजासहजी उपलब्ध होऊ शकतात.

* फळबागा लावण्यास व वाढविण्यास एक प्रकारे प्रोत्साहन मिळते.

* शेतकरी, ग्रामीण युवकांना शेतीपूरक रोजगार उपलब्ध होतो.

रोपवाटिका तयार करताना सुरवातीला आखणी करुन नकाशा तयार करणे महत्त्वाचे ठरते.

**रोपवाटिकेचे महत्त्वाचे भाग**

१) गादी वाफे : जमिनीपासून उंची ७ ते १५ सें.मी. ठेवावी. झाडांच्या सावलीत करू नये. २-३ मी. लांब १ मी. रुंद गादीवाफे करावे.

२) मोठे वाफे : गादी वाफ्यात रोपांची वाढ झाल्यावर मोठ्या वाफ्यात लावली जातात. त्यामुळे हे वाफे आकाराने मोठे असतात.

३) मातृवृक्ष बाग.

४) कुंड्या ठेवण्याकरता जागा.

५) कलमे रोपे काढल्यानंतर बांधण्याकरिता सावलीची जागा.

६) कलम रोपांना हार्डनिंग करण्यासाठी जागा.

७) सामान ठेवण्याची खोली व ऑफिस.

फळझाडांची अभिवृद्धी करणे म्हणजेच लिमा, दाब कलम, भेट कलम यासारख्या शाकीय प्रकारांनी प्रजोत्पत्ती करणे.

**अभिवृद्धी करण्याच्या महत्त्वाच्या पद्धती**

१) बियांद्वारे होणारी अभिवृद्धी (Sexual Propagation)

उदा. पपया, नारळ, लिंबू.

२) शाकीय पद्धतीने अभिवृद्धी (Asexual Propagation)

३) कटिंग (Hard wood, semi hard wood cutting)

उदा. द्राक्ष, रताळे.

४) दाब कलम (Layring)

उदा. चिकू, पेरू.

५) गुटी कलम (Marcottage)

उदा. डाळिंब, पेरू, चिकू, लिची.

६) डोळे भरणे (Budding)

उदा. गुलाब, बोर.

७) विभाजन (Division)

उदा. बटाटे, अननस, रताळे.

८) भेट कलम (Inarching)

९) अलग- अलग (Side Grafting)

उदा. आंबा, काजू व बोर.

रोपवाटिकेमध्ये रोपे- कलमांची निर्मिती व संगोपन करण्यासाठी विविध माध्यमे वापरली जातात, त्यांनाच रुटिंग मीडिया असेही म्हटले जाते.

उदाहरणार्थ माती, वाळू, हिरवे शेवाळ गुटी कलमासाठी वापरतात.

* व्हर्मिक्युलिट.

* कोकोपीट – नारळ फळावरील काथ्याचा कूट.

* लीफमोल्ड – अर्धवट कुजलेला पालापाचोळा.

* लाकडी भुसा – भुसा वापरताना नत्राचा वापर करावा म्हणजे भुसा कुजवणे सोपे होते.

* रॉकवूल.

* कोळसा, फ्लाईट.

समाजामध्ये अशी म्हण प्रचलित आहे की, 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी'. त्यामुळे मातृवृक्ष हा रोपवाटिकेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ज्या जातीची झाडे तयार करावयाची आहेत, त्यांची दाब कलमे, छाट कलमे व डोळे घेण्याकरिता जातिवंत, निरोगी, दर्जेदार व ज्यांच्या गुणांचा इतिहास पाहिला आहे अशीच झाडे मातृवृक्ष म्हणून रोपवाटिकेमध्ये लावली जातात. त्यांच्यापासून फळे घ्यावयाची नसल्यामुळे ती नेहमीच्या अंतरावर न लावता २.५. मी. ते ४ मी. किंवा ५ x÷५ मी. अंतरावर पिकाप्रमाणे लावलेली असावीत. त्यांचे वय ५ ते १२ वर्षे असावे.

**मातृवृक्षांचे प्रकार**

१) खुंटाचे मातृवृक्ष

उदा. * चिकू– खिरणी

* आंबा– रायवळ, आंबेलावी

* द्राक्ष – डॉगरीज, रामसे, ११०– आर

* संत्रा,मोसंबी – रंगपूर लाईम, रफ लेमन

२) फळझाडांचे मातृवृक्ष

उदा. डाळिंब, पेरू, लिची, द्राक्षे, तुती, केळी, यामध्ये मातृवृक्षाच्या कलमकांड्या, डोळकांड्या काढून त्या कलमे– रोपे करण्यासाठी वापरतात.

३) फुलझाडांचे मातृवृक्ष

उदा. अ) फाटे कलम, गुटी कलम, मुनव्यापासून येणारी फुलझाडे – जाईजुई, मोगरा, कार्नेशन, लिली, शेवंती.

ब) बियांपासून येणारी फुलझाडे– झेंडू, झिनिया

त्यामळे मातृवृक्ष निवडताना ते रोगमुक्त व जातिवंत असावेत. त्यांची लागवड रोपवाटिका सुरु करण्यापूर्वी करावी.

**रोपवाटिकेसंबंधी अनुदान**

राज्य शासनाच्या आणि केंद्र शासनाच्या उद्यानपिके विकासासाठी तसेच निर्यातीस चालना देण्यासाठी काही योजना आहेत. या सर्व प्रकारच्या योजना राज्याच्या कृषी विभागामार्फत राबविल्या जातात.

१) **राष्ट्रीय बागवानी मंडळ**

प्रकल्प किंमतीच्या २०% अनुदान Credit link backended subsidy (कर्जाशी संलग्न अनुदान ) रु.२५,००,०००/– पर्यंत ४ हेक्टर क्षेत्रासाठी.

२) **एकात्मिक बागवानी विकास अभियान**

४ हेक्टर क्षेत्राच्या हायटेक नर्सरीसाठी रु.२५,००,०००/– प्रति हे. असा खर्च अपेक्षित धरून प्रकल्प किंमतीच्या ४०% अनुदान दिले जाते. त्यासाठी कमीतकमी ५०,०००/- कलमे/ वर्षी/ हेक्टरी करणे आवश्यक.

३) लघुरोपवाटिका : १ हेक्टर क्षेत्रासाठी रु. १५,००,०००/– हेक्टर असा खर्च अपेक्षित आहे आणि त्यासाठी कमीतकमी रु. ७,५०,०००/– प्रति रोपवाटिका असे अनुदान दिले जाते. त्यासाठी २५,००० कलमे/ वर्षी/ हेक्टर करणे आवश्यक आहे.

४) रोपवाटिकेस ठिबक संच बसवण्यासाठी अनुदान दिले जाते.

५) हरितगृहाच्या उभारणीसाठी अर्थसाह्य मिळते. या योजनेअंतर्गत जीएच–वन, जीएच–टू आणि जीएच–थ्री प्रकारातील हरितगृहे (पॉलिहाऊसेस), शेडिंग नेट व आधुनिक अभिवृद्धिगृहे उभारण्यासाठी अनुदान दिले जाते.

६) एकात्मिक मसाला पिकांच्या विकासाच्या योजना.

या योजनेंतर्गत काळी मिरी, लवंग, आले, हळद इत्यादी पिकांचे बियाणे तयार करून वाटप करण्यासाठी अनुदान दिले जाते.

उत्पादनाचा दर्जा कायम राखण्यासाठी दर्जेदार कलमांची आवश्यकता असते. विविध फळपिकांना असलेले पोषक हवामान विचारात घेता, ज्या विभागात वाव आहे त्या विभागात त्या त्या फळपिकांच्या रोपवाटिकांची स्थापना करण्यात आली आहे. सध्या राज्यात सार्वजनिक क्षेत्रातील शासकीय १३६ व विद्यापीठांच्या ४२ अशा एकूण १७८ फळरोपवाटिका कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे खासगी क्षेत्रात १३०० रोपवाटिका कार्यरत असून, या रोपवाटिकांवर जवळपास २ ते २.५० कोटी विविध फळपिकांची कलमे, रोपे तसेच आवश्यकतेप्रमाणे फुले, भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती यांचे लागवड साहित्य तयार करण्यात येते. या सर्व गोष्टींचा लाभ घेऊन शेतकरी चांगल्या प्रकारे रोपवाटिकेचा फायदेशीर व्यवसाय करू शकतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना हमखास उत्पन्न मिळून त्यांच्यात आर्थिक स्थैर्य निर्माण होऊ शकते. ■